वर्ष : ०६ | अंक: ०२ | मुंबई, मंगळवार ३ डिसेंबर २०१९ ते सोमवार ९ डिसेंबर २०१९ | पृष्ठ: ४

मूल्य २/- रुपये

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

# पोलीस बातमी पत्र

POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

WeWite: www.policebatmipatra.com
www.policebatmipatra.in

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक | सह संपादक:- सौ अश्विनी नाईक-परब

PG 2 मंत्रिमंडळ विस्तार ३ किंवा ४ डिसेंबरला

3 लाचखोरीच्याही देशा..!

पेट्रोलपेक्षा कांदा महाग! 4



## मोदींच्या ड्रिम प्रोजेक्टवर सावट

# महत्त्वाकांक्षी बुलेट ट्रेन प्रकल्पाला मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंचा 'दे धक्का'?



**मुंबई - राज्यात सत्तांतर घडल्यामुळे अनेक निर्णय दोन दिवसांत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडून घेण्यात येत आहेत. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आरे कॉलनीतील मेट्रो कारशेड कामाला स्थगिती दिल्यानंतर आता इतर प्रकल्पांबाबत फेरविचार करण्याचे संकेत दिले आहेत. त्यामुळे मोदी सरकारचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असलेली बुलेट ट्रेनवरही निर्णय होण्याची शक्यता आहे.**


मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंनी रविवारी सांगितले की, बुलेट ट्रेन प्रकल्पाबाबत आढावा देण्याचे आदेश दिले आहेत. बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी पालघर जिल्ह्यातील अनेक शेतकरी आणि आदिवासी यांचा विरोध आहे. जमिन अधिग्रहण करण्यासाठी शेतकऱ्यांनी विरोध केला आहे. हे सरकार सर्वसामान्य माणसांचे आहे. असं मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

दरम्यान, बुलेट ट्रेनचं ओझं आमच्या डोक्यावर नको, बुलेट ट्रेन प्रकल्पाला सुरुवातीपासून शिवसेनेने विरोध केला आहे. तर महाराष्ट्रातील इतर राजकीय पक्षांनीही बुलेट ट्रेनला विरोध केला आहे. मात्र याबाबतचा निर्णय घेण्याचा अधिकार मुख्यमंत्र्यांना आहे. त्यामुळे मुख्यमंत्री उद्धव ठाकरेच बुलेट ट्रेनबाबत निर्णय घेतील असं शिवसेना नेते संजय राऊत यांनी सांगितले आहे.

### बुलेट ट्रेन प्रकल्पाबाबत

- अहमदाबाद आणि मुंबई शहरादरम्यान बुलेट ट्रेन सुरू करण्याची घोषणा २०१५ मध्ये करण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा ड्रिम प्रोजेक्ट असलेला बुलेट ट्रेन प्रकल्प पूर्ण करण्याची मुदत आधी २०२२ ठरवण्यात आली होती, पण आता ती २०२३ पर्यंत पुढे गेली आहे.
- १,०४९ कोटींहून अधिक रुपयांचा हा प्रकल्प पूर्ण झाल्यावर सूरत, अहमदाबाद आणि मुंबई ही केंद्र या द्रुतगती मार्गाने जोडली जाणार आहेत.
- आतापर्यंत या प्रकल्पासाठी लागणाऱ्या एकूण १,३८० हेक्टर जमिनीपैकी ५४८ हेक्टर जमीन सरकारने ताब्यात घेतली आहे. पालघरमध्ये लोकांचा या प्रकल्पाला विरोध आहे.

मात्र, बुलेट ट्रेनसाठी १९ हेक्टर शेतजमिनीचे संपादन आणि मोजमाप करण्याचे काम बहुतांश ठिकाणी झाले. यामध्ये २५० शेतकऱ्यांच्या जमिनीचा समावेश आहे. यात ठाणे तालुक्यातील नऊ गावांच्या शेतकऱ्यांच्या शेतजमिनीचे संपादन हाती घेतले आहे. पोलीस यंत्रणेच्या सतर्कतेने बहुतांश ठिकाणी काम झाले. पहिल्या टप्प्यातील शीळ, डावले, पडले, आगासन, बेतवडे, लहानी देसाई, मोठी देसाई आदी गावांच्या शेतकऱ्यांच्या शेतजमिनी व सरकारी जमिनींचे मोजमाप पूर्णत्वास येत आहे. मात्र, या जमिनी कोणत्या दराने संपादित केल्या जात आहेत, हे प्रशासनाकडून सांगितले जात नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप आहे. त्यामुळे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे बुलेट ट्रेनबाबत काय निर्णय घेतात हे आगामी काळात स्पष्ट होईल.




## सोनई ऑनर किलिंग

# पाच जणांची फाशी उच्च न्यायालयाकडून कायम

**महाराष्ट्राला हादरवून सोडणाऱ्या अहमदनगर जिल्ह्यातील सोनई येथील बहुचर्चित तिहेरी हत्याकांडाप्रकरणातील सहापैकी पाच आरोपींची शिक्षा मुंबई उच्च न्यायालयाने कायम ठेवली आहे. तर याच प्रकरणातील अशोक नवगिरे या आरोपीची पुराव्याअभावी न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली आहे. जानेवारी २०१३ मध्ये सोनईजवळील गणेशवाडी शिवारातील विठ्ठलवाडी येथे ही घटना घडली होती.**

विठ्ठलवाडी येथे संदीप राज धनवार (वय २४), राहुल कंडारे (वय २६), सचिन घारू (वय २३) या दलित मेहतर समाजातील तरुणांची अमानुषपणे हत्या करण्यात आली होती. हे तिघे तरुण नेवासे फाटा येथील त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठानमध्ये कामाला होते. त्यांना स्वच्छतागृहाची टाकी साफ करायची आहे असे सांगून विठ्ठलवाडी येथे बोलावून घेण्यात आले आणि त्यांची निर्घृणपणे हत्या करण्यात आली होती. सचिन घारुचे एका तरुणीशी प्रेमसंबंध होते आणि याच रागातून सहा ते सात जणांनी



त्यांची हत्या केली होती.

प्रकाश विश्वनाथ दरंदले, रमेश विश्वनाथ दरंदले, पोपट विश्वनाथ दरंदले, गणेश पोपट दरंदले, अशोक रोहिदास फलके, अशोक नवगिरे, संदीप कुऱ्हे यांना या प्रकरणात अटक झाली होती. नाशिकमधील सत्र न्यायालयाने यातील अशोक फलकेला न्यायालयाने दोषमुक्त केले. तर उर्वरित सहा आरोपींना न्यायालयाने दोषी ठरवले.

नाशिक सत्र न्यायालयाच्या निर्णयाला मुंबई उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आलं होतं. या खटल्याची सुनावणी होऊन उच्च न्यायालयानं प्रकाश विश्वनाथ दरंदले, रमेश विश्वनाथ दरंदले, पोपट विश्वनाथ दरंदले, गणेश पोपट दरंदले आणि संदीप कुऱ्हे या पाचजणांना फाशीची शिक्षा सुनावली असून अशोक नवगिरे याची पुराव्याअभावी या प्रकरणातून निदोष मुक्तता करण्यात आली आहे.

सोनईतील तिहेरी हत्याकांडाने राज्यभरात खळबळ उडाली होती. राजकीय हस्तक्षेपामुळे पोलीस तपासात हलगर्जीपणा करत असल्याचा आरोप झाला होता. पोलिसांनी या प्रकरणात सुरुवातीला अकस्मात मृत्यूचा गुन्हा नोंदवला. घटना घडल्याच्या दोन दिवसांनी खुनाचा गुन्हा नोंदवला. दलित संघटनांनी आक्रमक भूमिका घेतल्याने शेवटी तत्कालीन गृहमंत्री आर. आर. पाटील यांनी या प्रकरणाचा तपास सीआयडीकडे सोपवला होता.

## स्वतंत्र म्हटल्या जाणाऱ्या प्रगतशिल भारतात

# पोलिसांना कोणी वाली आहे का?



१.साप्ताहिक सुट्टी हि नाईट ड्युटी करून देतात ती कुठल्या आदेशाने

२.नाईट ड्युटी रात्री ८.०० ते सकाळी ८.०० एकूण १२ तास ड्युटी झाल्यानंतर किती तास आराम दयावा किंवा नाईट ड्युटी झाल्यावर पुढील ड्युटी मध्ये किती अंतर असावे सोबत वैद्यकीय अधिकारी यांची माहिती प्रत मागायची आहे. कि रात्री १२ तास जागल्या नंतर किती तास आराम आवश्यक आहे.

३.सकाळी १० ते ६ पर्यंत ड्युटी केल्यानंतर शासकीय कर्मचारी यांना किमान १४ तास अंतर असते

४.शासकीय कर्मचारियाना दुसऱ्याआणि चौथ्या शनिवार सुट्टी असते सोबत ४ रविवार अश्या एकूण ६ सुट्या compulsory असतात पोलिसांना ४ च साप्ताहिक सुट्या असतात

५.MSEB तसेच इतर २४ तास सेवा देणारे खाते याना ओव्हर time केल्यास अतिरिक्त मोबदला मिळतो पोलिसांना का नाहि जर दिला जात नाही तर त्याची प्रत ज्या अन्वये दिला जात नाही आणि ज्यांना दिला जातो ती प्रत

६.मानवी शरीराला किती तास काम केल्या नंतर किती आराम आवश्यक आहे

७.ट्राफिक पोलीस ला एकूण किती तास उभी ड्युटी द्यावी त्याबद्दल माहिती आणि वैद्यकीय अधिकारी याना मनुष्य एका वेळेस न बसता किती तास उभा राहू शकतो आणि पुन्हा उभे राहण्यासाठी त्याला किती तास आराम आवश्यक आहे सोबत शरीरावर होणाऱ्या प्रदूषणाचा

उर्वरित पृष्ठ 2 वर




# धक्कादायक! मुंबईत धावत्या ट्रेनमधून पतीने गर्भवती पत्नीला ढकललं बाहेर



### मूल नको असल्याचा राग

रेल्वे प्रवासात वादावादी झाल्यानंतर संतापाच्या भरात पतीने गर्भवती पत्नीला धावत्या लोकलमधून ढकलून दिले. मुंबईतील दहीसर-मीरा रोड रेल्वे स्थानकादरम्यान ही धक्कादायक घटना घडली. सागर धोडी (२५) असे आरोपीचे नाव आहे. सागर आणि त्याची पत्नी राणी ट्रेनने नालासोपाऱ्याला जात असताना त्यांच्यामध्ये भांडण सुरु झाले. रागाच्या भरात सागरने राणीला ट्रेनमधून बाहेर ढकलले. टाइम्स ऑफ इंडियाने हे वृत्त दिले आहे.

सुदैवाने यावेळी ट्रेनचा वेग कमी असल्यामुळे राणीचे प्राण बचावले. सागरला मूल नको होते त्यावरुन तो सतत माझ्या बरोबर भांडण करायचा असे राणीने पोलिसांना सांगितले. या घटनेनंतर सागर फरार झाला

उर्वरित पृष्ठ 2 वर



# संपादकीय...

## लाचखोरीच्याही देशा..!



संपादकः-
दिपक मोरेश्वर नाईक

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१४मध्ये पहिली शपथ घेतली. त्याआधी प्रचारात त्यांनी 'ना खाऊंगा, ना खाने दूंगा...' या प्रचाराने कोट्यवधी मतदारांना भुरळ घातली. आता तर मोदी दुसऱ्यांदा पंतप्रधान झाले आहेत. मात्र, या साऱ्या काळात भारतातील भ्रष्टाचाराचे प्रमाण, आकडेवारी आणि त्यात गुंतलेले नागरिक यांचे प्रमाण कमी झाले का, असे विचारले तर निराशा पदरी येते. 'ट्रान्स्फरन्सी इंटरनॅशनल' ही संस्था दरवर्षी सगळ्या देशांचा विविध निकषांवर तक्ता बनवते. त्यात त्या त्या देशातील व्यवहारांची पारदर्शकता अनेक प्रकारे जोखली जाते. या संस्थेने आजवर भारताला कधीही 'उत्तीर्ण' केलेले नाही. काही काळापूर्वी एकूण भ्रष्टाचाराच्या काळ्या यादीतील भारताचे स्थान अचानक सुधारले. ती आनंदाची बाब होती. मात्र, आता 'ट्रान्स्फरन्सी इंटरनॅशनल इंडिया'च्या ताज्या अहवालात निदान ५१ टक्के भारतीयांनी यंदा कोणत्या ना कोणत्या कारणासाठी लाच दिली, असा निष्कर्ष आहे. खरेतर, कोणत्याही भारतीय नागरिकाला या निष्कर्षाने धक्का बसणार नाही. साऱ्या भारतीयांना एकाचवेळी भ्रष्टाचाराच्या विरोधात आक्रंदून बोलण्याची आणि त्याचवेळी गुंतागुंतीच्या व सोप्याही समस्यांवर 'व्यावहारिक तोडगा' काढण्याची कला आत्मसात आहे. काहीजण त्याला 'तोडबाजी' असे अश्लाघ्य नाव देतात. 'ट्रान्स्फरन्सी इंटरनॅशनल'ने देशाच्या वीस राज्यांमधील एक लाख ९० हजार नागरिकांशी प्रश्नोत्तरे करून असा अंदाज केला की, सगळ्यांत जास्त लाचखोरी राजस्थानात आहे तर सर्वात कमी केरळात. महाराष्ट्र हा नेहेमीच सर्व बाबतीत उत्तर आणि दक्षिण यांचा समतोल साधत असतो. त्यानुसार महाराष्ट्र या वीस राज्यांच्या मधोमध आहे. गेल्या वर्षी अशाच स्वरूपाच्या पाहणीत ५६ टक्के भारतीय नागरिकांनी 'आपण निदान एकदातरी लाच दिली आहे,' अशी कबुली दिली. ही टक्केवारी यंदा पाच टक्क्यांनी कमी झाली आहे. या अहवालातून आशा जागवायची असेल तर हेच प्रमाण कायम राहिले तर पुढच्या दहा वर्षात भारत पूर्णपणे भ्रष्टाचारमुक्त होईल, असा निष्कर्ष काढता येईल. भ्रष्टाचार करणाऱ्यांचे प्राधान्य कशाला असते, हेही अहवालात नमूद केले आहे. भेटवस्तू किंवा जंगम काहीबाही घेण्यापेक्षा ६४ टक्के नागरिक स्वच्छपणे रोकड घेण्यासच प्राधान्य देतात. ऐतिहासिक नोटबंदी झाल्यानंतरची ही स्थिती आहे. याचा अर्थ, घेतलेली रोकड लपविण्याची किंवा हिशेबाबाहेर ठेवण्याची युक्ती आजही सर्वदूर चलनात आहे. भ्रष्टाचाराच्या विरोधातले सैनिक नेहेमी असे सांगतात की, लाच घेणारा जितका दोषी, तितकाच देणाराही गुन्हेगार असतो. तत्त्वतः किंवा कायद्याने पाहिले तर हे खरेच आहे. मात्र, हे नागरिक आपखुशीने आपले व दुसऱ्याचे हात काळे करतात का, हा खरा सवाल आहे. नोकरशाही किंवा अडणीवरचे आडगे नागरिकांची कशी कोंडी करतात, हेही या पाहणीत दिसले. लाच देणारे ६४ टक्के नागरिक सांगतात की, विनासायास आणि विनाविलंब काम व्हायचे असेल तर तुम्हाला पैसे द्यावेच लागतील, असे बजावण्यातच आले होते. याचा अर्थ, एकापरीने हे 'ब्लॅकमेलिंग' होते. पोलिस खाते, महसूली कार्यालये, मालमत्ता नोंदणी, जमिनीच्या व्यवहारांची नोंद, रुग्णालये.. या व अशा इतर सर्व ठिकाणी सामान्य माणूस मूळ कामांनीच इतका कातावलेला असतो की, त्याच्या अंगात या लाचखोरीच्या विरोधात लढण्याचे बळ उरलेले नसते. त्यातच त्याचे एकाकीपण त्याला अधिकच दुबळे बनवते. आपण उठवलेला आवाज कधी, कसा व कायमचा चिरडून टाकला जाईल, याचीही काही शाश्वती नसते. अशावेळी, कसेतरी पैसे टिकवून सरकारी फासातून आपली मान लवकरात लवकर कशी मोकळी करून घेता येईल, याकडे त्याचा ओढा असतो. गेली अनेक वर्षे केंद्र तसेच विविध राज्य सरकारे ई-प्रशासनातून भ्रष्टाचार कमी करण्याचा प्रयत्न करीत आहेत. तसेच, जागोजागी लाच मागितल्यास तक्रार कुठे करावयाची, याचे दूरध्वनी क्रमांक डकवलेले असतात. अगदी रेल्वेस्थानकांमध्ये दहा रुपयांचा पदार्थ किंवा चहाची पावती मिळाली नाही, तर तो पदार्थ वा चहा मोफत देण्यात येईल, असे राणा भीमदेवी फलक लावण्यापर्यंत पारदर्शकता मोहिमेची मजल गेली आहे. पण हा सगळा उजेड कागदोपत्रीच आहे. त्याने काळ्या व्यवहारांचा अंधार अणुमात्र दूर होत नाही. याचे कारण नागरिकांचा भ्रष्टाचाराच्या विरोधात सरकार, प्रशासन किंवा पोलिस ठामपणे लढतील किंवा आपल्याला साथ देतील, यावर बिलकुल विश्वास नाही. काल हेच होते व आजही तेच आहे. आता नव्या राजवटीत महाराष्ट्र आपले मधले स्थान सोडून राजस्थानच्या दिशेने झेपावतो की केरळला जवळ करतो, हेही कळेलच!

# महाविकास आघाडीच्या सरकारची संयमी सुरुवात

***महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर आले आणि पहिल्या दोन तासांत गुरुवारी रात्रीच ते कामालाही लागले. कोणतेही नवे सरकार सत्तेवर आले की, पहिल्याच मंत्रिमंडळ बैठकीत लोकानुनय करणारे निर्णय घेण्याकडे त्याचा कल असतो. मात्र, तसे करताना राज्याच्या तिजोरीला हे निर्णय परवडतील की नाही, याचाही विचार न करता आर्थिक बोजा वाढविणाऱ्या घोषणा केल्या जातात. त्यातून तेवढ्यापुरती प्रसिद्धी जरूर मिळते. मात्र, तिजोरीवर आणि पर्यायाने जनतेच्या डोक्यावर कर्जाचा बोजा वाढण्याशिवाय काहीही साध्य होत नाही. देशभर कोणत्याही राज्यात हेच दिसून येते, पण महाराष्ट्राच्या नवनिर्वाचित मंत्रिमंडळाने या मोहात न पडता चांगला पायंडा पाडला.***



राज्यात ओल्या दुष्काळामुळे हजारो शेतकरी त्रस्त आहेत. कोट्यवधींचे नुकसान झाले आहे. सत्तेवर आलेल्या काँग्रेस, राष्ट्रवादी आणि शिवसेनेच्या नेत्यांनी सरकारमध्ये येण्याआधी राज्यभर दुष्काळ पाहणी दौरे केले होते. त्यात संपूर्ण कर्जमाफीची मागणीही त्यावेळी राज्यपालांकडे केली होती. शिवसेनाची भूमिका कर्जमाफीची नाही, तर कर्जमुक्तीची राहिलेली आहे. ती त्यांनी वारंवार जाहीर केलेली आहे. शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करणारच, असे आश्वासन सत्तेत येण्याआधी उद्धव ठाकरे करत होते. या सगळ्या पार्श्वभूमीवर मंत्रिमंडळाच्या पहिल्याच बैठकीत कर्जमाफी होणार, असे राज्यभरातील शेतकरी गृहीत धरून होते, पण आपल्या पहिल्याच बैठकीत या नव्या सरकारने असे काहीही केले नाही. या आधी किती घोषणा झाल्या आहेत? केंद्राने किती निधी दिला आहे? राज्याने किती निधीची तरतूद केली? प्रत्यक्षात किती कर्जमाफी दिली गेली? या सगळ्या प्रश्नांची माहिती तातडीने गोळा करून वस्तुस्थिती दर्शवणारा अहवाल मंत्रिमंडळासमोर ठेवा. आम्हाला शेतकऱ्यांना भरीव मदत करायची आहे, नुसते आश्वासन द्यायचे नाही, असे सांगत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी संयमी भूमिका घेतली. ही अत्यंत चांगली गोष्ट आहे. राज्याच्या तिजोरीचा अंदाज न घेता उगाच लोकप्रिय घोषणा करण्याचा मोह मुख्यमंत्र्यांनी टाळला. हाच संयम त्यांना राज्य चालविताना पदोपदी दाखवावा लागेल. त्यासाठी अनेकदा अप्रिय निर्णयदेखील घ्यावे लागतील. वेळप्रसंगी कटुता घ्यावी लागेल, पण घेतलेल्या निर्णयांची कारणे जर जनतेला विश्वासात घेऊन समजावून सांगितली; तर जनता सोबत येईल. शेवटी राज्याची तिजोरी भक्कम राहिली, तर राज्य भक्कम राहील.

आजवरच्या सरकारांनी जनतेला गृहीत धरण्याचे काम केले आहे. खरी माहिती द्यायची नाही; आर्थिक भार आधीच्या सरकारमुळे आला असे सांगत राहायचे, या शब्दजंजाळातून प्रश्न कधीच सुटत नाहीत. उलट ते आणखी जटिल होत जातात. भाजप सरकारने पाच वर्षे हेच केले. काँग्रेस- राष्ट्रवादीने जे केले, त्यापेक्षा आम्ही कसे वेगळे केले, यातच त्यांनी पाच वर्षे घालविली. महाआघाडी सरकारने तो मोह टाळावा. उलट राज्याचे वास्तव चित्र त्यांनी जनतेसमोर आणावे. खरी माहिती द्या, त्यावरचे उपाय जनतेलाही विचारा, विश्वासाचे वातावरण निर्माण करा. सरकारच्या निर्णय प्रक्रियेचे आम्हीदेखील एक भाग आहोत, हा आत्मविश्वास राज्यात सकारात्मक वातावरण तयार करण्यास मदतच करेल. रोज एकमेकांच्या विरोधात बोलायचे, जुन्या भाषणांच्या व्हिडीओंना नव्याने फोडणी द्यायची, हे कोणीतरी थांबवायला हवे. नाहीतर जुन्या आणि नव्यांमध्ये फरकच नाही, हे वास्तव पुन्हा लोकांसमोर येईल.

टीका करणे सोपे असते, हे आत्ताच्या सत्ताधा-यांना विरोधात असताना कळून चुकले आहे आणि आत्ताच्या विरोधकांना सरकारची परिस्थिती कशी आहे, हे चांगलेच माहिती आहे. त्यामुळे विकासाच्या कामात राजकारण न आणता, जनतेच्या आशाआकांक्षांना पंख द्या, त्यांचे प्रश्न सुटले; तर हीच जनता तुम्हाला डोक्यावर घेईल. त्यांची ताकद हीच राज्याची ताकद आहे, याचा विसर पडू देऊ नका. जी संयमी सुरुवात केली आहे, त्यासाठी हे सरकार अभिनंदनास पात्र आहे, पण ही केवळ सुरुवात ठरू नये, ही अपेक्षाही आहे.

# नाल्यावर बेकायदा पार्किंग, मीरा-भाईंदरमध्ये कोट्यवधी खर्चून बांधलेली गटारे मोडकळीस

**मीरा रोड - करदात्यांच्या पैशांतून कोट्यवर्धींचा खर्च करून महापालिकेने बांधलेले सिमेंट - काँक्रिटच्या नाल्यांवर बेकायदा वाहन पार्किंगचा विळखा कायम आहे. यामुळे कोट्यवर्धींचे बांधलेले नाले वाहनांच्या भाराने कमकुवत होऊन मोडकळीस आले आहेत. यातून पालिकेचे कोट्यवर्धींचे नुकसान होऊन खर्च पाण्यात जाणार आहे.**

मीरा-भाईंदर महापालिकेने शहरात लहानमोठे नाले सिमेंट-काँक्रिटचा स्लॅब टाकून ते बंदिस्त केले आहेत. त्यासाठी कोट्यवर्धींचा खर्च केला आहे. हे बंदिस्त नाले पादचाऱ्यांसाठी चालण्यास मोकळे ठेवणे अपेक्षित आहे. पण, महापालिका अधिकारी आणि स्थानिक नगरसेवकांच्या सातत्याने चालवलेल्या दुर्लक्षामुळे या बंदिस्त नाल्यांवर बेकायदा पार्किंगचे अतिक्रमण झालेले आहे.

पालिकेच्या बंदिस्त नाल्यांच्या स्लॅबवर सर्रास मोठ्या बस, ट्रक, टेम्पो आदी अवजड वाहनांसह चारचाकी गाड्या उभ्या केल्या जात आहेत. या अवजड वाहनांमुळे नाल्यांवरील काँक्रिट स्लॅब आणि ब्लॉक कमकुवत होऊन मोडकळीस आले आहेत. काही ठिकाणी नाल्याचे स्लॅब व त्यावरील काँक्रिटची झाकणे वाकली आहेत, तर काही ठिकाणी तुटली आहेत.

त्यामुळे नाले बांधकामासाठी केलेल्या कोट्यवधी रुपयांचा खर्च नाल्यात जात आहे. या वाहनांच्या बेकायदा पार्किंगमुळे नाल्यावरील चेंबरची झाकणेसुद्धा तोडण्यात आली आहेत. परंतु, या गंभीर प्रकरणात आजतागायत महापालिका आणि नगरसेवकांनी मूग गिळून गप्प बसण्याची भूमिकाच कायम ठेवली आहे. त्यातच या बेकायदा पार्किंगआड गर्दुल्ले आणि व्यसनींचा गोतावळा वाढला आहे. महिला-मुलींना याचा मनस्ताप होत आहे.

त्यातच, या वाहनांच्या आडोशाला प्रेमीयुगुलांचे चाळे आणि अनैतिक प्रकार चालत असल्याने स्थानिक रहिवासी त्रासले आहेत. बेकायदा वाहन पार्किंगसह नाल्यांच्या स्लॅबवर चक्क गॅरेज थाटली आहेत. काही ठिकाणी अतिक्रमण केले आहे. सर्वात जास्त या सर्वच प्रकारांकडे स्थानिक पोलिसांसह वाहतूक पोलिसांनीही सातत्याने हात झटकण्याची भूमिका घेतली आहे.



# अमली पदार्थांच्या अड्ड्यांवर कारवाई

## ठाणे ते बदलापूरपर्यंत पोलिसांची मोहीम



**ठाण्यातील निसर्गरम्य आणि शांत परिसर असलेल्या येऊर तसेच उपवन परिसरात अमली पदार्थांची विक्री आणि सेवन होत असल्याची बाब कारवाईतून समोर आल्यानंतर ठाणे पोलिसांनी आता शहरांमधील अशा प्रकारचे अड्डे उद्ध्वस्त करण्याची मोहीम हाती घेतली आहे. या दोन्ही ठिकाणांसह ठाणे ते बदलापूरपर्यंतच्या शहरात ही मोहीम राबविण्यात येत असून येत्या ३१ डिसेंबपर्यत ही मोहीम सुरू राहणार असल्याची माहिती ठाणे पोलिसांनी दिली. या मोहिमेदरम्यान अमली पदार्थ विक्रीची टोळी हाती लागण्याची शक्यता वर्तविली जात आहे.**

नववर्ष स्वागताच्या पूर्वसंध्येला दरवर्षी ठाणे आणि मुंबईतील हॉटेल, फार्म हाऊस तसेच पर्यटन स्थळांच्या ठिकाणी पाटर्य़ाचे आयोजन करण्यात येते. अशा पाटर्य़ामध्ये अमली पदार्थांचे सेवन केले जात असल्याची बाब यापूर्वीच्या पोलीस कारवाईतून अनेकदा समोर आली आहे. त्यामुळे ३१ डिसेंबरला आयोजित केल्या जाणाऱ्या पाटर्य़ावर पोलिसांची नजर असते. असे असले तरी गेल्या काही वर्षांपासून शहराच्या विविध भागांत अमली पदार्थ विक्री आणि सेवन करणाऱ्यांवर पोलिसांनी कारवाई केली आहे. अशाच प्रकारे ठाण्यातील येऊर तसेच उपवन तलाव परिसरातून पोलिसांनी अमली पदार्थांचा साठा जप्त केला आहे. दोन दिवसांपूर्वी या ठिकाणी एलएसडी पेपर आणि एमडी पावडर या अमली पदार्थांच्या विक्रीसाठी आलेल्या चौघांना ठाणे पोलिसांनी अटक केली होती. यामुळे येऊर तसेच उपवन तलाव परिसर अमली पदार्थ विक्री आणि सेवनाचा अड्डा बनू लागल्याचे बोलले जात आहे. शहराच्या विविध भागांतील निसर्गरम्य ठिकाणीही असेच प्रकार सुरू असल्याच्या तक्रारी पोलिसांकडे येऊ लागल्या आहेत. राबोडी येथे युनिट एकने दोन आठवडय़ांपूर्वी मेथेएम्फेटाईन या अमली पदार्थांच्या १२८ गोळ्या जप्त केल्या होत्या. जून महिन्यात वर्तकनगर येथे २५ एलएसडी पेपर विक्रीसाठी आलेल्या दोघांना पोलिसांनी अटक केली होती, तर मुंब्रा येथेही एका घरातून मोठय़ा प्रमाणात गांजा जप्त करण्यात आला होता. कल्याण येथील दुर्गाडी भागात पोलिसांनी दोन जणांकडून २० किलो गांजा जप्त केला होता. या पार्श्वभूमीवर ठाणे पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणे अमलीविरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय पोवार यांनी आता विशेष मोहीम राबविण्याचा निर्णय घेतला असून त्यामध्ये ठाणे ते बदलापूरपर्यंतच्या शहरातील अमली पदार्थ विक्री आणि सेवनाचे अड्डे उद्ध्वस्त केले जाणार आहेत. या मोहिमेसाठी विशेष पथकांची नेमणूक करण्यात आली असून त्यामार्फत शहरामध्ये गस्त घालणार आहेत.

# पेणकरपाड्यातून ७७ लाखांचा गुटखा जप्त


**मीरारोड -** काशिमीरा पोलीस ठाणे हद्दीतील पेणकरपाडा भागातल्या एका गोदामातुन बंदी असलेला ७७ लाखांचा गुटखा सापडला आहे. अन्न व औषध प्रशासन आणि काशिमीरा पोलीसांनी ही कारवाई केली असून एका कर्मचाऱ्यास अटक केली असली तरी पाच आरोपींचा पोलीस शोध घेत आहेत.

अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी मिळालेल्या माहितीनंतर पेणकरपाड्यातील विशा भारवाड चाळीत असलेल्या फजल काझी यांच्या गाळ्यावर पोलीसांसह एकत्र येऊन धाड टाकली होती. या गोदामात गुटखा साठवून नंतर तो मुंबई, ठाणे आदी भागात पुरवठा केला जात असल्याची माहिती होती. गोदामात सापडलेला कर्मचारी चांद इब्राहिम शेख रा. जनता नगर, काशिमीरा या कर्मचारायास अटक करण्यात आली होती.

काझी यांनी सदर गाळा भाड्याने दिला असून या प्रकरणी पाच आरोपींचा शोध सहाय्यक निरीक्षक गणेश भामरे व पथक घेत आहेत. घटनास्थळवारुन ४ के स्टार गुटखा आणि एसएचके गुटख्याने भरलेल्या ३२६ गोणी सापडल्या आहेत. सदर साठा अन्न व औषध प्रशासनाने आपल्या ताब्यात ठेवला आहे. बंदी असूनही शहरात राजरोसपणे गुटखा विक्रीच्या तक्रारी असतानाच आता गुटख्याच्या साठ्याचे गोदामच सापडल्याने परिसरातील नागरीकांनी देखील संताप व्यक्त केला आहे.

# बालकांची सुरक्षा वाऱ्यावर

## पाच वर्षे उलटूनही महापालिकेच्या बाल संरक्षण समित्यांना मुहूर्त मिळेना



लहान बालकांचे सर्व प्रकारच्या शोषणापासून संरक्षण करून त्यांच्यासाठी सुरक्षित वातावरण निर्माण करण्यासाठी महापालिका स्तरावर बालसंरक्षण समिती स्थापन करण्याच्या राज्य शासनाच्या निर्णयाची वसई-विरार शहर महापालिकेने पाच वर्षांचा कालावधी उलटूनही अद्यापही अंमलबजावणी केलेली नाही. त्यामुळे बालकांच्या सुरक्षेकडे महापालिका गांभीर्याने पाहत नसल्याची टीका होत आहे.

बाल न्याय (काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ च्या कलम १०६ नुसार १८ वर्षांखालील मुलांचे सर्व प्रकारच्या शोषणापासून, अत्याचारापासून संरक्षण मिळविण्यासाठी आणि सुरक्षित वातावरण निर्माण करण्यासाठी महाराष्ट्र राज्य शासनाने दिनांक १० जून २०१४ रोजी राज्यभरात बाल संरक्षण समित्या स्थापन करण्याबाबतचा निर्णय घेतला होता. राज्यातील सर्व महानगरपालिकांनी आपल्या क्षेत्रात प्रभागनिहाय अशा समित्या उभारण्याचे आदेश देण्यात आले होते. त्याला पाच वर्षे उलटली असूनही अद्यापही वसई-विरार शहर महापालिकेने अशा प्रकारच्या समित्या स्थापन केलेल्या नाहीत.

गेल्या काही वर्षांत लहान मुलांवर होणाऱ्या अत्याचारांमध्ये मोठय़ा प्रमाणात वाढ झालेली दिसून येते. मुलांच्या लैंगिक शोषणाचे प्रमाण वाढत चालले आहे. याशिवाय बालमजूर आणि विधिसंघर्षग्रस्त मुलांचे प्रमाण वाढताना दिसत आहे. अनेक ठिकाणी मुलांसाठी सुरक्षित मोकळ्या जागा नाहीत, मैदाने नाहीत. अशा अनेक समस्या मुलांच्या बाबतीत आढळून येतात. या पार्श्वभूमीवर भाजपच्या युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष अशोक शेळके यांनी महापालिकेचे बाल संरक्षण समितीसारख्या महत्त्वाच्या प्रश्नाकडे महापालिकेचे लक्ष वेधून अशा समित्यांच्या स्थापनेसाठी त्यांनी पाठपुरावा सुरू केला आहे.

# वसईत आता रविवारी होणार भारनियमन; आर्थिक नुकसान टळणार

**विरार :** वसईतील औद्योगिक कंपन्यांमध्ये दर आठवड्याला शुक्र वारी होणारे भारनियमन आता रविवारी घेतले जाणार आहे. महावितरणने नुकताच हा निर्णय घेतला आहे. या निर्णयाने वसईतील असंख्य औद्योगिक कंपन्यांचे आर्थिक नुकसान टळणार असून त्यांना दिलासा मिळेल.

वसई तालुका हा औद्योगिक क्षेत्र म्हणून ओळखला जातो. येथे असंख्य मॅन्युफॅक्चरिंग व सेवा देणाऱ्या कंपन्या आहेत. या कंपन्यांमध्ये महावितरणाकडून दर आठवड्याला शुक्र वारी भारनियमन केले जाते. यामुळे कंपन्यांचे मोठे आर्थिक नुकसान व्हायचे. कंपन्यांतील कामगारांनाही भारनियमनामुळे शुक्र वारी सुट्टी घ्यावी लागायची व रविवारच्या सुटीपासून वंचित राहावे लागायचे. त्यामुळे कंपन्याचे भारनियमनामुळे नुकसान व्हायचे. दरम्यान, आता यावर महावितरणने औद्योगिक क्षेत्रातील भारनियमनाचा वारच बदलला आहे. त्यामुळे नव्या वारानुसार आता वसई तालुक्यातील औद्योगिक कंपन्यातील भारनियमनाचा वार हा रविवार असेल. वसई तालुक्यातील औद्योगिक कंपन्यांमध्ये भारनियमन आता शुक्र वारी न घेता रविवारी होणार आहे.

# कोकाकोला कंपनीचे शेतकऱ्याच्या जागेत अतिक्र मण

**वाडा :** वाडा तालुक्यातील कुडूस ग्रामपंचायतीच्या हद्दीत कोकाकोला ही शीतपेये बनविणारी कंपनी असून या कंपनीने येथील शेतकरी नागेश जाधव यांच्या गट नंबर २८९ मधील एक एकर जमिनीवर अतिक्र मण केले असून वारंवार सांगूनही हे अतिक्र मण दूर केलेले नाही. तसेच महसूल प्रशासनही याकडे दुर्लक्ष करत असल्याने संतापलेल्या शेतकऱ्याने आपल्या कुटुंबासह अतिक्रमण केलेल्या जागेवर १ डिसेंबरपासून बेमुदत उपोषणाचा इशारा तहसीलदारांना दिलेल्या निवेदनात दिला आहे.

निवेदनात नागेश जाधव म्हणतात, मी कुडूस गावाचा रहिवासी असून शेतकरी आहे. माझी कोकाकोला कंपनीजवळ गट नंबर २८९ ही जमीन असून या जमिनीतील एक एकर जागेवर कंपनीने अतिक्र मण केले आहे. या जमिनीवर भातशेती असताना तिचा वापर बिगर शेतीसाठी केला असल्याचे जाधव यांनी तक्रारीत म्हटले आहे. आमच्या जागेची भूमिअभिलेख कार्यालयाकडून मोजणी करून हद्द सुध्दा कायम करून घेतल्याचे निवेदनात नमूद केले आहे.

# मैदान सोडून पळणार नाही, शत्रूला अंगावर घेणार

## मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचा भाजपला अप्रत्यक्ष इशाराच



**मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळाच्या शपथविधीच्या वेळी राष्ट्रपुरुष आणि देवदैवतांची नावे घेतली गेल्याने घटनेतील तरतुदीनुसार शपथविधी झालेला नाही, असा आक्षेप माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नोंदविताच सत्ताधारी बाकांवरून त्याला प्रत्युत्तर देताना विधानसभेत वेगळेच वळण लागले. विरोधकांनी पहिल्याच दिवशी सरकारला लक्ष्य केल्याने काहीसे नाराज झालेल्या मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मैदान सोडून पळणार नाही आणि शत्रूला अंगावर घेण्यास धजावणार नाही, असा अप्रत्यक्ष इशाराच भाजपला दिला. एकूणच नव्या सरकारचा विधानसभेतील पहिला दिवस हा कटुतेतच पार पडला.**

कामकाजाला सुरुवात होताच मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळाचा शपथविधी नियमाला धरून झालेला नाही, असा आक्षेप माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला. शपथविधीसाठी घटनेत नमुना तयार करण्यात आला आहे. यानुसारच शपथ घ्यायची असते. पण मुख्यमंत्री व अन्य मंत्र्यांनी नमुन्यानुसार शपथ घेतलेली नाही. मुख्यमंत्री आणि मंत्र्यांची शपथ नियमानुसार नसल्याने हे सरकारच बेकायदा ठरते, असा आक्षेपही फडणवीस यांनी घेतला. अमेरिकेत बराक ओबामा यांनी अध्यक्षपदाची शपथ घेताना चूक झाली होती. परिणामी त्यांना दुसऱ्या दिवशी पुन्हा शपथ घ्यावी लागली होती याकडे फडणवीस यांनी लक्ष वेधले.

फडणवीस यांनी शपथेवरून लक्ष्य केल्याने मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, जयंत पाटील आणि छगन भुजबळ यांनी फडणवीस यांना प्रत्युत्तर दिले. शिवाजी महाराज किंवा राष्ट्रपुरुष, दैवत, आईवडिलांना स्मरून शपथ घेतल्याने बिघडले कुठे, असा सवाल मुख्यमंत्र्यांनी केला. विधिमंडळातील माझा हा पहिलाच दिवस होता, पण जे काही झाले ते चांगले नव्हते. मी तलवार म्यान केलेली नाही. वैचारिक मतभेद असू शकतात. मी सामना करण्यास सज्ज आहे. पण ज्या पद्धतीने जे सारे झाले ते योग्य नव्हते, असेही ठाकरे म्हणाले. छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल देवेंद्र फडणवीस यांना असूया आहे का, असा सवाल राष्ट्रवादीचे जयंत पाटील यांनी केला. आधी आपापल्या दैवतांची किंवा नेत्यांची नावे घेतली. त्यानंतर घटनेतील तरतुदीनुसारच साऱ्यांनी शपथ घेतली याकडे पाटील यांनी लक्ष वेधले. लोकसभेत शपथ घेताना सत्ताधारी भाजपच्या सदस्यांनी जय श्रीरामचा नारा दिला होता. मग लोकसभेतील खासदारांची शपथ घटनाबाह्य होती, असा दावा फडणवीस करतील का, असा प्रश्न छगन भुजबळ यांनी केला. प्रचाराच्या वेळी देवेंद्र फडणवीस म्हणाले होते की विरोधी पक्ष मला दिसतच नाही. पण त्यांच्यावरच आता विरोधी पक्षात बसण्याची वेळ आल्याचा टोला काँग्रेसचे बाळासाहेब थोरात यांनी हाणला. मध्यरात्री अधिवेशनाचे निमंत्रण मिळाले याबद्दल फडणवीस यांचा आक्षेप आहे. पण सरकार स्थापण्याची मध्यरात्री केलेली तयारी त्यांना चालली का, असा टोला शिवसेनेचे एकनाथ शिंदे यांनी लगावला. पाच वर्षे शिवसेनेमुळेच फडणवीस हे मुख्यमंत्रिपदी होते याचा त्यांना बहुधा विसर पडलेला दिसतो, याची आठवण शिंदे यांनी करून दिली.

# पेट्रोलपेक्षा कांदा महाग!



**नवी दिल्ली: भारतीय बाजारपेठेत कांद्यांचा पुरवठा वाढविण्यासाठी सरकारने तुर्की देशातून कांदा आयात करण्याचा निर्णय घेतला आहे. तुर्कीमधून ११,००० कांदा आयात करण्याचा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्रात कांद्याचे भाव सध्या ९० ते १०० रुपये असून दिवसेंदिवस कांद्याचे भाव वाढत आहे. तसेच दिल्लीमध्ये अधिकृत नोंदणीनूसार ८२ रुपये प्रतिकिलो कांद्याचे भाव सध्या सुरु आहे. सरकारच्या या निर्णयामुळे तुर्कीमधून कांदा आयात झाल्यानंतर कांद्याचे भाव कमी होणार असल्याचे सांगण्यात येत आहे.**

- *तुर्की तब्बल ११ हजार टन कांदा पाठवणार*
- *मुंबईत कांद्याला मिळाला शंभर रुपयांचा विक्रमी भाव*
- *किरकोळ बाजारात कांदा १२० रुपये किलो*

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, एमएमटीसीने तुर्की येथून ११,००० टन कांद्याच्या आयातीचा करार केला असून पुढील वर्षी जानेवारीत कांद्याची आयात होईल असं सांगण्यात येत आहे. त्याचप्रमाणे सरकारने इजिप्तकडून कांदा आयात करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानूसार एमएमटीसीने ६०९० कांद्याची ऑर्डर दिली होती. परंतु कांद्याची पहिली फेरी १२ डिसेंबरपर्यत भारतात पोहचणार असल्याचे सांगण्यात येत आहे.



कांद्याच्या किंमतींवर नजर ठेवण्यासाठी गृहमंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली मंत्र्यांचा एक गट तयार करण्यात आला आहे. अर्थमंत्री, ग्राहक व्यवहार मंत्री, कृषीमंत्री आणि रस्ते वाहतूक मंत्री हेही या पॅनेलचे सदस्य आहेत. सचिवांची समिती (सीओ) आणि ग्राहक व्यवहार सचिव अविनाश के. श्रीवास्तव यांच्याकडून सतत परिस्थितीचा आढावा घेण्यात येत आहे.

### मुंबईत कांद्याला मिळाला शंभर रुपयांचा विक्रमी भाव

आवक घटल्याने राज्यभर कांद्याची भाववाढ सुरूच आहे. सोमवारी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये कांदा ६० ते १०० रुपये किलो अशा उच्चांकी दराने विकला गेला. घाऊक बाजारात पहिल्यांदाच बाजारभावाचे शतक पूर्ण झाले असून किरकोळ बाजारात चांगल्या प्रतिचा कांदा १२० रुपये किलो दराने विकला जात आहे. पावसामुळे राज्यभर कांदा पिकाचे नुकसान झाले आहे. अशातच उन्हाळी कांद्याचा साठा संपत आला असून नवीन पीक पुरेशा प्रमाणात आलेले नाही. यामुळे सर्वच बाजारात कांद्याचा तुटवडा जाणवत आहे. मुंबईमध्ये शनिवारी १६६६ टन आवक झाली होती. तेव्हा घाऊक बाजारात ५० ते ६० रुपये दराने विक्री झाली. तर रविवारी १०७८ टन आवक झाली असून बाजारभाव ६० ते १०० रुपये किलो झाले आहेत. मुंबई बाजार समितीमध्ये पहिल्यांदाच कांद्याला प्रति किलो १०० रुपये भाव मिळाला आहे. किरकोळ बाजारातही कांद्याचे दर वाढू लागले आहेत. नवीन कांदा किरकोळ बाजारात ८० ते १०० रुपये व जुना कांदा १०० ते १२५ रुपये किलो दराने विकला जात आहे.

### महागाईमुळे चोरट्यांचे लक्ष कांद्यावर

राज्यभर सुरू असलेल्या टंचाईमुळे चोरट्यांनीही कांद्यावर लक्ष केंद्रित केले आहे. मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये १५ ते २० महिला व मुले प्रतिदिन कांदा चोरून नेत आहेत. चोरी करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची लेखी मागणी कांदा-बटाटा अडत व्यापारी संघटनेने बाजार समिती सचिवांकडे केली आहे. मुंबईमध्ये प्रतिदिन १२०० ते १६०० टन कांद्याची मागणी आहे; परंतु सद्यस्थितीमध्ये सरासरी एक हजार टन आवक होत आहे. बुधवारी फक्त ८९६ टन आवक झाली आहे. मागणीच्या तुलनेमध्ये आवक कमी होत असल्यामुळे बाजारभाव मोठ्या प्रमाणात वाढू लागले आहेत. सद्यस्थितीमध्ये होलसेल मार्केटमध्ये कांद्याचे दर ६० ते १०० रुपये झाले आहेत. किरकोळ मार्केटमध्ये हेच दर १३० रुपये प्रतिकिलो झाले आहेत. महागाई दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे आता चोरट्यांनीही कांद्यावर लक्ष केंद्रित केले आहे. मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये १५ ते २० महिला व काही लहान मुले कचऱ्यात टाकलेला खराब माल उचलण्याच्या बहाण्याने मार्केटमध्ये प्रवेश करत आहेत.

# ओळखपत्राच्या पुराव्याशिवाय 'असं' काढा आधार कार्ड

मुंबई: आधार ओळखपत्र हे आता एक महत्त्वाचं कागदपत्र बनलं आहे. पॅन कार्डासाठी अर्ज करायचा असो की आयकर परतावा भरायचा असो किंवा कुठलंही सरकारी अनुदान घ्यायचं असो, त्यासाठी आधार कार्ड अनिवार्य आहे. आधार कार्ड तयार करण्यासाठी आपल्याला पॅन कार्ड, पासपोर्ट, मतदान ओळखपत्र आदि अधिकृत ओळखपत्राचा पुरावा द्यावा लागतो. पण असं कोणतंही कागदपत्र नसेल तर आधारकार्ड कसं काढायचं?

ळघ्ॐ्‌ड च्या आधार एनरोलमेंट फॉर्मनुसार, जर कोणाकडे प्रूफ ऑफ आयडेंटिफिकेशनसाठी कागदपत्र नसेल तरी ती व्यक्ती आधार कार्डासाठी अर्ज करू शकते. त्यासाठी एकतर कोणी परिचयदाता किंवा कुटुंबातील सदस्याची आवश्यकता असते.



जर कोणाकडे अधिकृत ओळखपत्राचा पुरावा नसेल तरी तो आधार कार्डासाठी अर्ज करू शकतो. त्यासाठी त्याचं नाव त्याच्या कुटुंबातील कोणत्याही एका कागदपत्रावर असावं लागतं. उदाहरणार्थ, रेशन कार्ड (शिधापत्रिका). पण यासाठी हे अनिवार्य आहे की आधी कुटुंबप्रमुखाने आधार कार्ड बनवावं. त्यानंतर तो प्रमुख कुटुंबातील इतर सदस्यांचा परिचयदाता होऊ शकतो.

परिचयदात्याने आपलं ओळखपत्र सोबत घेऊन जावं. केंद्रावर तो सदस्यही स्वत: उपस्थित हवा. दोघांमधील नातं दाखवणारं कोणतंही कागदपत्र हवं. या नात्याच्या पुराव्यासाठी पुढील विविध प्रकारच्या कागदपत्रांची यादी सरकारने दिलेली आहे.

# गॅस सिलिंडर वजन करूनच घ्या

## ग्राहक संघटनांचे आवाहन

**घरपोच मिळणाऱ्या गॅस सिलिंडरची तपासणी आणि वजन करणे नियमाने अनिवार्य आहे. मात्र नियमाचे उल्लंघन करीत डिलिव्हरी करणारे तपासणी आणि वजन करणे सर्रास टाळतात. याबाबत ग्राहकदेखील जागरूक नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे अनेक ग्राहकांना कमी वजनाचे सिलिंडर मिळत असल्याचा फटका बसत आहे. विनातपासणी केलेला एखादा धोकादायक सिलिंडर घरी आल्यास त्यातून मोठी दुर्घटना होण्याची शक्यता आहे. त्यामुळे गॅस सिलिंडर वजन करूनच घ्यावे, असे आवाहन ग्राहक संघटनांनी केले.**



### कंपन्यांच्या परिपत्रकाची अवहेलना

भारत पेट्रोलियम, हिंदुस्तान पेट्रोलियम व इंडियन ऑईल या तिन्ही तीनही प्रमुख कंपन्यांच्या डीलर्सतर्फे सिलिंडर घरपोच देताना त्याची संपूर्ण तपासणी आणि वजन करण्याची जबाबदारी ग्राहकांची आहे. बऱ्याचदा डिलिव्हरी करणाऱ्यांकडे वजन करण्याचे मशीन उपलब्ध नसल्याचे दिसते. त्यामुळे अनेक ग्राहकांना कमी वजनाचे सिलिंडर मिळतात, असे पाहणीत आढळून आले आहे. सिलिंडरची तपासणी आणि वजन करून देण्याचे परिपत्रक कंपन्यांनी काढले आहे. नियमाचे पालन करण्याच्या सूचना प्रत्येक डीलर्सला देण्यात आल्या आहेत. पण कंपन्यांच्या सूचनांचे पालन होत नसल्याचे दिसून येत आहे.

### डिलिव्हरी बॉय मागतो जास्त पैसे

नोव्हेंबरमध्ये घरगुती विनाअनुदानित सिलिंडरचे दर ७२३.५९ रुपये आहेत. पण डिलिव्हरी बॉय घरपोच देताना जास्त पैसे अर्थात तब्बल ७५० रुपये मागतो. आम्हाला डीलर्स घरी सिलिंडर पोहोचविण्याचे पैसे देत नाही, अशी सबब सांगून ते किमतीपेक्षा जास्त पैसे वसूल करीत असल्याच्या अनेक तक्रारी आहेत. तक्रारीनंतरही डीलर्स अशा डिलिव्हरी बॉयला पाठिशी घालत असल्याचे दिसून येत आहे.

### नियमांचे पालन व्हावे

वैधमापन शास्त्र अधिनियम २००९ अंतर्गत ग्राहकांना सिलिंडर देताना वजन करून देणे बंधनकारक आहे. सिलिंडरवर उल्लेख केलेले वजन १०० ग्रॅम कमी भरले तरी तो सिलिंडर परत करण्याचा अधिकार ग्राहकाला आहे. घरगुती गॅस सिलिंडरमध्ये निव्वळ गॅसचे वजन १४.२ किलो असणे आवश्यक आहे. याबाबत कंपन्यांच्या टोल फ्री क्रमांकावर तक्रार करता येते.

### ग्राहकांची जबाबदारी महत्त्वाची

घरी गॅस सिलिंडर आल्यानंतर त्याची तपासणी आणि वजन करण्याची सक्ती ग्राहकांनी करणे, ही त्यांची नैतिक जबाबदारी आहे. मात्र अनेकांना याबाबत माहितीच नाही. अशा प्रकारची तपासणी सुरक्षेच्या दृष्टीने अत्यावश्यक असल्याचे ग्राहकांना माहिती नसल्यामुळे त्यांच्याद्वारे सक्ती केली जात नाही. परिणामत: कमी वजनाचे, लिकेज असलेले सिलिंडर त्यांना वापरावे लागते. याबाबत ग्राहकांनी जागरूक असायला हवे आणि सिलिंडर वजन करूनच घ्यावे.

# धक्कादायक! पिंपरीत दिवसाआड एक बलात्कार

**पिंपरी : उद्योगनगरी पिंपरी-चिंचवडमध्ये सरासरी दिवसाआड एक महिला बलात्काराची शिकार होत आहे; तर दररोज एका महिलेचा विनयभंग होत असल्याची धक्कादायक आकडेवारी समोर आली आहे. जानेवारी ते नोव्हेंबर या ११ महिन्यांच्या कालावधीत शहरात बलात्काराच्या १३४ घटना घडल्या आहेत; तर विनयभंगाच्या ३७७ घटना घडल्या आहेत. त्यामुळे शहरातील महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा पुढे आला आहे.**



पिंपरी-चिंचवड शहरात गेल्या ११ महिन्यांत तब्बल १३४ महिलांवर बलात्कार झाला आहे; तर ३७७ महिलांचा विनयभंग करण्यात आला आहे. शहरात महिन्याला सरासरी १२ महिलांवर बलात्कार होत आहे. तर, ३४ महिलांना विनयभंगासारख्या प्रसंगांना सामोरे जावे लागत आहे. बलात्काराच्या १३४ गुन्ह्यांपैकी १३२ गुन्ह्यांतील आरोपींना पकडण्यात पोलिसांना यश आले आहे. तर, उर्वरित दोन गुन्ह्यांतील आरोपींचा शोध पोलिस घेत आहेत. विनयभंगाच्या ३७७ गुन्ह्यांपैकी ३७१ गुन्ह्यांचा तपास पूर्ण झाला आहे. उर्वरित गुन्ह्यांचा तपास सुरू आहे. पिंपरी-चिंचवड शहर आणि परिसरात मोठ्या प्रमाणात कामगार वर्ग आहे. यामध्ये महिला कामगारांचा मोठा समावेश आहे. त्याचप्रमाणे शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थी विद्यार्थिनींचीही मोठी संख्या आहे. गेल्या काही वर्षांमध्ये उद्योगनगरीमध्ये विविध प्रकारची गुन्हेगारी बळावली आहे. त्यात महिलांवर होणारे अत्याचार या गुन्ह्यांचाही समावेश आहे. बलात्काराच्या गुन्ह्यांमध्ये लग्नाच्या आमिषाने बलात्कार; तसेच प्रेम प्रकरणातून बलात्कार हे गुन्हे अधिक प्रमाणात आहेत. विनयभंगाच्या प्रकारांमध्ये सार्वजनिक ठिकाणी होणारा विनयभंग; तसेच घरातील व ऑनलाइन पद्धतीने झालेल्या विनयभंगाच्या प्रकारांचा समावेश आहे. दरम्यान, पोलिसांनी या गुन्ह्यांतील आरोपींना अटक केली असली; तरी हे गुन्हे घडण्यापासून कसे रोखायचे, या मोठा प्रश्न पोलिसांसमोर आहे.







हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. २, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)